वेतनासाठी 300 कोटी

एसटी कर्मचाऱ्यांसाठी निधी मंजूर; अपुरा असल्याचा आरोप

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

'सदावर्ते, पडळकर कुठे आहेत?'

मुंबई : 'एसटी महामंडळातील सुमारे ९० हजार कर्मचाऱ्यांना अद्याप वेतन मिळाले नाही. यामुळे एसटी चालक, वाहक व अन्य कर्मचाऱ्यांचे अतोनात हाल होत आहेत. आता त्यांचे नवनेतृत्व करणारे भाजप समर्थक नेते गुणरत्न सदावर्ते आणि गोपीचंद पडळकर हे कुठे आहेत,' असा प्रश्न राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश प्रवक्ते महेश तपासे यांनी केला. 'तत्कालीन महाविकास आघाडी सरकार असताना या कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी दर महिन्याला ३६० कोटी रुपयांची तरतूद राज्य सरकारच्या तिजोरीतून केली जात होती. आता सहा महिन्यांपासून कर्मचाऱ्यांचा पगार वेळेवर होत नाही,' असे तपासे म्हणाले.

राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित वेतनाचा प्रश्न लवकरच निकाली लागण्याची शक्यता आहे. या कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी राज्य सरकारने ३०० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्याचा निर्णय गुरुवारी रात्री उशिरा जाहीर केला. मात्र, हा निधी अपुरा आहे. त्यातून केवळ वेतन होणार असून निवृत्ती वेतन, ग्रॅच्युइटी व बँक कर्ज ही देणी प्रलंबित राहतील. सरकारने एसटी कर्मचाऱ्यांना पुन्हा वाटाण्याच्या अक्षता लावण्याचा प्रकार केला, असा आरोप एसटी कर्मचाऱ्यांच्या संघटनांकडून केला जात आहे.

राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन प्रत्येक महिन्याच्या ७ ते १० तारखेदरम्यान होते. मात्र यंदा त्याला विलंब झाल्याने एसटी कर्मचारी आणि विविध संघटनांनी नाराजी व्यक्त केली होती. याप्रकरणी संघटनांनी आक्रमक पवित्रा घेतल्यानंतर राज्य सरकारने गुरुवारी रात्री याबाबतचा निर्णय जाहीर केला. तरीही कर्मचारी संघटनांची नाराजी कायम आहे. महाराष्ट्र एसटी कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी राज्य सरकारवर टीका केली. हा कर्मचाऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचा प्रकार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. 'एसटी कर्मचाऱ्यांना वेतनासाठी देण्यात येणाऱ्या दरमहा आर्थिक मदतीकडे सरकार जाणूनबुजून दुर्लक्ष करत आहे. शिंदे-फडणवीस सरकार आल्यापासून कामगारांचे निवृत्ती वेतन, ग्रॅच्युइटी, बँक कर्ज व इतर मिळून ९७८ कोटी रुपयांची रक्कम थकीत आहे. वेतनावर अवलंबून असलेल्या विविध संस्था अडचणीत आल्या आहेत. या महिन्याच्या २ तारखेला ९५० कोटी वेतनासाठी मिळावेत, असा प्रस्ताव सरकारच्या मंत्रालयातील अर्थ खात्याकडे एसटी महामंडळाने पाठवला होता. त्यावर अर्थ खात्यातील अधिकाऱ्यांनी तातडीने निर्णय घेण्यात असमर्थता दाखवली,' असा आरोपही बरगे यांनी केला.

'कर्मचाऱ्यांचा असंतोष पाहून गुरुवारी त्यावर निर्णय घेण्यात आला. पण ९५० कोटींपैकी केवळ ३०० कोटी रुपये इतका निधी सरकारकडून एसटी महामंडळाला मिळाला आहे. या अपुऱ्या निधीमुळे पुन्हा बँक, निवृत्ती वेतन, ग्रॅच्युइटी आणि इतर रक्कम देणी प्रलंबित राहणार आहेत. सरकार वारंवार कर्मचाऱ्यांची व महामंडळाची फसवणूक करत आहे,' असे बरगे यांनी यावेळी स्पष्ट केले.

बीडीडी पुनर्विकासाच्या नावावरून राजकारण तापले

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

बीडीडी चाळींच्या पुनर्विकास प्रकल्पाचे महाविकास आघाडी सरकारच्या काळात नामकरण करण्यात आले. मात्र आता मुंबई महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या नामांतराच्या मुद्द्यावरून राजकारण तापायला सुरुवात झाली आहे. या तिन्ही प्रकल्पांच्या आधीच्या नामकरणाला भाजपने विरोध केला असून नवे नाव देण्याची मागणी करण्यात आली आहे.

महाविकास आघाडी सरकारने वरळी बीडीडी चाळीला स्व. बाळासाहेब ठाकरे नगर, ना. म. जोशी मार्ग बीडीडी चाळीला स्व. राजीव गांधी नगर आणि नायगाव येथील बीडीडी चाळीला शरद पवार नगर असे नाव देण्याचे निश्चित केले होते, तसा सरकार निर्णयही जाहीर केला होता. त्यावेळी बीडीडी चाळींमधील इतर संघटनांनी या नामकरणाला कडाडून विरोध केला. वरळीमधील वसाहतीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर नाव द्यावे, अशी मागणी करण्यात आली होती.

याशिवाय इतर चाळींना छत्रपती शिवाजी महाराज नगर आणि महात्मा फुले नगर अशी नावे देण्याबाबतचीही मागणी करण्यात आली. श्रीपाद अमृत डांगे, आचार्य अत्रे, अहिल्याताई रांगणेकर, एस. एम. जोशी, पी. के. कुरणे, प्रबोधनकार ठाकरे यांची नावेही पुढे आली. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. आता भाजपचे आमदार कालिदास कोळंबकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत, नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर बीडीडी कॉम्प्लेक्स असे नाव देण्याची मागणी केली आहे.

संभाजी भिडेंकडून खुलासा सादर?

मुंबई : महिला पत्रकाराला उद्देशून केलेल्या वादग्रस्त विधानाबाबत संभाजी भिडे यांनी अखेर महिला आयोगाकडे खुलासा पाठविल्याची खात्रीलायक माहिती हाती आली आहे. मात्र राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी याबाबत मौन बाळगले आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या पश्चिम महाराष्ट्रातील अनेक नेत्यांचे भिडे यांच्याशी अत्यंत सौहार्दाचे संबंध आहेत. या खुलाशामुळे नवा वाद निर्माण होऊ नये, म्हणूनच महिला आयोग गप्प असल्याचे सूत्रांकडून समजते.

संभाजी भिडे यांनी काही दिवसांपूर्वीच मंत्रालयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली होती. या भेटीबाबत मंत्रालयातच त्यांना एका खासगी वाहिनीच्या महिला पत्रकाराने विचारणा केली असता, 'आमची अशी भावना आहे, प्रत्येक स्त्री भारतमातेचे रूप आहे. भारत माता विधवा नाही. कुंकू लाव, मग तुझ्याशी बोलेन,' अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली होती. भिडे यांच्या या वक्तव्यानंतर राज्यभरातून संतप्त प्रतिक्रिया उमटल्यानंतर राज्य महिला आयोगाने याची गंभीर दखल घेत त्यांना नोटीस पाठविली होती. या नोटिशीला भिडे यांनी कोणतेही उत्तर न दिल्याने महिला आयोगाने दुसऱ्यांदा नोटीस बजावित दिलेल्या मुदतीत उत्तर न दिल्यास त्यांचे काही म्हणणे नाही, असे गृहीत धरून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा दिला होता.

महिला आयोगाने दिलेल्या या नोटिशीनंतर अखेर संभाजी भिडे यांनी आपला खुलासा सादर केला. काही दिवसांपूर्वीच हा खुलासा सादर करण्यात आला आहे. महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांच्याशी संपर्क केला असता, त्यांनी भिडे यांनी खुलासा सादर केल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. मात्र या खुलाशाबाबत त्यांनी अधिक माहिती दिली नाही.

पोलिस सुरक्षेवरून शिरसाट नाराज

मुंबई : राज्यातील सत्तांतरानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षातील आमदार नाराज असल्याच्या चर्चा अधूनमधून येत असताना आता शिंदे यांच्या पक्षाचे औरंगाबादचे आमदार संजय शिरसाट यांची तीन दिवसांपासून पोलिस सुरक्षा काढण्यात आल्याने ते नाराज झाल्याची माहिती समोर आली आहे. शिरसाट यांनी स्वतः नाराजी व्यक्त केली. तसेच आपल्या जिवाला धोका उद्भवल्यास त्याला पोलिस जबाबदार राहतील, असा इशाराही दिला. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

एक लाख रोजगार निर्माण होणार

मुंबई : 'राज्यातील महिला व बालविकास क्षेत्रातील अंगणवाड्या व बालसुधारगृहांचे बळकटीकरण, पर्यटनाला चालना देणे आणि कौशल्य विकास क्षेत्राला गती देणे, यासाठी कॅनडा येथील इंडो कॅनेडियन चेंबर ऑफ कॉमर्ससोबत शुक्रवारी सामंजस्य करार करण्यात आला. या कराराच्या माध्यमातून पर्यटन आणि कौशल्य विकासात एक लाख रोजगार निर्माण होतील. तसेच महिला व बालविकास विभागाच्या विकासाला चालना मिळेल,' असे मत राज्याचे पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केले.

दिनांक १४ जानेवारी ते २८ जानेवारी २०२३ या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करणेबाबत.

मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शासकिय / निमशासकिय कार्यालये/ महामंडळे, केंद्र शासनाच्या अखत्यारीतील सर्व कार्यालये, मंडळ / महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, सर्व खाजगी व व्यापारी बँका, सर्व शैक्षणिक संस्था / विद्यापीठे/ महाविद्यालये इत्यादी संस्थामधून राज्याची राजभाषा असलेल्या मराठी भाषेचा वापर व्हावा आणि मराठी भाषेचे संवर्धन व्हावे या हेतूने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा दिनांक १४ जानेवारी २०२३ ते दिनांक २८ जानेवारी २०२३ या कालावधीत साजरा करणेत येणार असून सर्व कार्यालयानी शासन निर्देशानुसार आपल्या स्तरावरून विविध कार्यक्रमांचे आयोजन करावे.

स्वाक्षरी/-
(राजीव निवतकर)
जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर

DGIPR/2022-2023/5353

Reliance
Industries Limited
Growth is Life

नोंदणीकृत कार्यालय: ३रा मजला, मेकर चेंबर्स ४, २२२, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१
दूरध्वनी: +९१-२२-३५५५ ५००० • फॅक्स: +९१-२२-२२०४ २२६८ • ई-मेल: investor.relations@ril.com
CIN: L17110MH1973PLC019786

सूचना

(कंपनीच्या इक्विटी भागधारकांसाठी)

विषय: कंपनीच्या इक्विटी समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणात हस्तांतरण

गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरण (लेखा, लेखापरिक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६, सुधारणा केलेल्या ("नियम") मधील तरतुदींनुसार ही सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

इतर मुद्द्यांसोबत वरील नियमांमध्ये ज्या भागधारकांच्या लाभांशांचे सलग सात किंवा अधिक वर्षे वितरण होऊ शकलेले नाही किंवा ज्यावर दावा करण्यात आलेला नाही अशा सर्व समभागांचे गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी ("आयईपीएफ") प्राधिकरणाकडे हस्तांतरण करण्याबाबत तरतूद आहे.

नियमातील विविध आवश्यकतांचे पालन करताना कंपनीने आर्थिक वर्ष २०१४-१५ किंवा तत्पूर्वीच्या ओळीने सात किंवा अधिक वर्षांच्या कालावधीसाठी लाभांशाचे पैसे न देण्यात आलेल्या किंवा दावा न केलेल्या सर्व समभागांचे त्यांच्या संबंधित देय तारखांना आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरण केले आहे. कंपनीने, आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात येणाऱ्या समभागांच्या संबंधित, योग्य कार्यवाही करण्यासाठी, दिनांक १२ जानेवारी, २०२३ च्या पत्राद्वारे व्यक्तिगतरित्या संबंधित भागधारकांना कळविले आहे.

कंपनीने आपल्या वेबसाईटवर **www.ril.com** आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र असलेल्या समभागांचा व सदर भागधारकांचा तपशिल उपलब्ध केला आहे. भागधारकांना **https://www.ril.com/InvestorRelations/ShareholdersInformation.aspx** ही वेब-लिंक पाहण्याची आणि त्यामधील न मिळालेल्या लाभांशाच्या तपशिलाची व आयईपीएफ प्राधिकरणात हस्तांतरित होण्यास पात्र समभागांची पडताळणी करण्याची विनंती करण्यात येत आहे.

भागधारकांनी याची नोंद घ्यावी की नियमानुसार कार्यवाही पूर्ण करून, भागधारक दावा न केलेला लाभांश व समभाग, दोन्ही जे आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यात आलेले आहेत, सदर समभागांवर जमा सर्व लाभांसह, काही असल्यास, आयईपीएफ प्राधिकरणाकडे पुन्हा दावा करू शकतील.

प्रत्यक्ष स्वरूपात समभाग धारण करणारे आणि ज्यांचे समभाग आयईपीएफ प्राधिकरणामध्ये हस्तांतरित होण्यास पात्र आहेत अशा संबंधित भागधारकांनी कृपया याची नोंद घ्यावी की, त्यांच्याकडे असलेल्या मूळ समभाग प्रमाणपत्राऐवजी कंपनी नियमांनुसार डिमटेरिअलाइझ करण्यासाठी आणि आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरित करण्यासाठी सदर समभाग प्रमाणपत्रांची नविन प्रत जारी करेल आणि अशा प्रकारे सदर प्रमाणपत्र जारी केल्यानंतर, त्यांच्या नावे नोंदणी करण्यात आलेले मूळ समभाग प्रमाणपत्र आपोआप रद्द होईल आणि त्याद्वारे कोणताही व्यवहार करता येणार नाही. भागधारकांनी ह्याची देखील नोंद घ्यावी की, कंपनीच्या वेबसाईटवर कंपनीने उपलब्ध केलेला भागधारकांचा तपशिल हा या नियमांतर्गत आयईपीएफ प्राधिकरणाकडे समभाग हस्तांतरित करण्यासाठी कंपनीद्वारा जारी करण्यात येणाऱ्या समभाग प्रमाणपत्रांच्या नविन प्रतीसाठीची योग्य सूचना आहे.

कंपनीला संबंधित भागधारकांकडून १५ एप्रिल, २०२३ रोजी किंवा तत्पूर्वी कोणतेही उत्तर (दावा न केलेल्या/वसूल न केलेल्या लाभांशाचा दावा करण्यासंदर्भात) न मिळाल्यास, नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या पद्धतींनुसार कॉर्पोरेट कार्यवाहीद्वारे कंपनी नियमांमध्ये निश्चित करण्यात आलेल्या आवश्यकतांची पूर्तता करण्यासाठी समभाग डिमटेरिअलाईजकरून ते आयईपीएफ प्राधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करेल.

भागधारकांना या संदर्भात आणि नियमांविषयी काही शंका असल्यास, त्यांनी श्री. एस. पी. वेणुगोपाल, उपाध्यक्ष, **केफिन टेक्नॉलॉजीस् लिमिटेड**, कंपनीचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट यांच्याशी पत्ता: सेलेनियम टॉवर बी, प्लॉट नं. ३१-३२, गचीबोवली, फायनान्शियल डिस्ट्रीक्ट, नानाक्रमगुडा, हैद्राबाद - ५०० ०३२; टोल फ्री क्र: १८००-३०९-४००१ (सर्व कामकाजाच्या दिवशी सकाळी ९.०० (भाप्रवेळ) ते सायंकाळी ६.०० (भाप्रवेळ)), ई-मेल: rilinvestor@kfintech.com; वेबसाईट: www.kfintech.com येथे संपर्क साधावा.

रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड करिता
सही/-
सावित्री पारेख
कंपनी सेक्रेटरी
आणि कंप्लायन्स ऑफिसर

स्थळ : मुंबई
दिनांक : १३ जानेवारी, २०२३

www.ril.com

राजश्री 200
Government Lottery
तिकीट ₹200
पहिले बक्षीस
जिंका
₹51लाख
दुसरे बक्षीस ₹50लाख
तिसरे बक्षीस ₹20लाख
सोडत दिनांक: 19.01.2023
Book Now At:
bookmyrajshree.com
Call Now : 022 6835 1535

JANA SMALL FINANCE BANK
(A Scheduled Commercial Bank)

BE A BANKER - SPOT OFFERS
WALK-IN INTERVIEW
Date: 16th & 17th January, 2023. Time: 9:00 AM to 5:00 PM

Customer Relationship Executive Collections (CREC), Collections & Recoveries Officer (C&RO), Area Collection & Connect Manager (ACM), Customer Relationship Executive (Gold CREM), Telecaller (Vashi & Panvel)

- Education : 10th / 12th / Graduate Pass
- Experience : Candidates new to job & with experience can apply
- Age Limit : 27 Years - Sales Collection, 35 years - Area Collection Manager
- Job Locations : Andheri, Ghatkopar, Chembur, Vashi, Panvel

Documents Required: Copy of Resume, PAN, Aadhaar Card, Last 3 Month's Salary Slips & Educational Certificates

You Can Earn Good Salary, Attractive Performance Linked Variable Pay & Medical Benefits!

INTERVIEW LOCATIONS

Branch Name	Venue Details
Andheri	Jana Small Finance Bank Ltd., Ground Floor, Poruchesty Building, Opp Lallubhai Park, Near Masrani Hospital, Andheri West, Mumbai - 400058. Contact Person: Netaji Kesarkar (7019896759)
Chembur	Jana Small Finance Bank Ltd., 8, Arjun Centre Govandi Station Road, Near Deonar Best Depot, Govandi, Mumbai - 400088. Contact Person: Prabhunath Yadav (7019900985)

www.janabank.com

On the Occasion of Wedding Presenting
New Crafts
Silk India®
2023
Exhibition cum Sale
An opulent show of Ethnic & Traditional Silk, Cotton Handloom Products made by master 100 Weavers from all over India
Silk Saree | Suits | Dress Material | Stoles | Dupattas | Kurtas Kurties | Pure & Probable Silk | Tussar Silk | Shanthipur Silk

HOTEL TIP TOP PLAZA
Near Check Naka, Lal Bahadur Shastri Marg., Thane, Mumbai
From : 11th to 18th Jan. 2023

Products on Display - Orissa : Sambhalpuri Ikkat Silk Saree, Bihar : Oragnic Tassar Silk Sarees, Suit & Stoles, Assam : Muga & Eri Silk Sarees, Karnataka : Creap Silk, Georgette Silk, Arini Silk & Printed Sarees, Tamilnadu : Kanjeevaram Silk Sarees & Designer Fancy Sarees, Andra Pradesh : Dharmavara, Uppada, Gadwal, Mangalagiri & Pochampalli Sarees, Uttar Pradesh : Mulbari Silk, Jamdani, Jamawar Silk Sarees & Chiffon Silk, Maharashtra : Designer Dress materials, Chhatisgarh : Exclusive Raw Silk Sarees, Kosa Silk, Tassar Suit & Duppatta, Madhya Pradesh : Maheswari, Chanderi Silk Sarees & Suit, West Bengal : Baluchari, Dhaka Masli, Gicha Sarees, Boutique Sarees, Kantha Sarees, Zordoshi, Jammu & Kashmir : Chinon Silk, Tady Silk Printed Sarees, Pashmina Shawls & Suit, Rajasthan : Kota Silk, Hand Block Print Dress & Sarees, Punjab : Fulkari Dress and many more...

5 Days Only
Visit Today

Time : 10.30 am - 8.30 pm Call: 08850 902824 Entry & Parking Free
All Credit & Debit Cards Accepted

Khadi India
मकरसंक्रांतीच्या
हार्दिक शुभेच्छा
anuved
celebrating tradition
Panchamrit